औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक १

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥

श्रीगुरुभ्यो नमः ॥

नामधारक शिष्यराणा। लागे सिद्धाचिया चरणां।

करसंपुट जोडून। विनवीतसे तया वेळीं॥ १ ॥

गद्यरुप :-

मी श्रीगणेशाला नमस्कार करतो. मी श्रीसरस्वतीला नमस्कार करतो. मी श्रीगुरुंना नमस्कार करतो.

नामधारक शिष्यराणा सिद्धमुनींच्या पाया पडला. त्यावेळी त्याने हाताचा द्रोण(ओंजळ) करुन सिद्धमुनींना विनविले.

शब्दार्थ

राणा=राजा, मुख्य	चरण=पाय
कर= हात	संपुट= द्रोण (ओंजळ)

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक २

जय जया सिद्ध योगीश्वरा। तूंचि ज्योति अंधकारा।
भक्तजनांच्या मनोहरा। भवसागरतारका ॥ २ ॥

गद्यरुप :-

“सिद्ध योगीश्वरा तुझा जयजयकार असो.तूच अंधकारातील (अंधारातून मार्ग दाखविणारी) ज्योत आहेस. तू भक्तजनांचे मन हरण करणारा आहेस. तूच संसाररुपी सागरातील तारक (संसारसागर तरुन नेणारा) आहेस.”

शब्दार्थ

भव=संसार	सागर= समुद्र

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ३

अज्ञानतिमिररजनींत। निजलों होतों मदोन्मत्त। 3
गुरुचरित्र मज अमृत। प्राशन करविलें दातारा॥ ३ ॥

गद्यरुप :-

मी अज्ञानाच्या अंधाऱ्या रात्रीत उन्मादाने माजल्या सारखा झोपलेलो होतो. हे दातारा, गुरुचरित्ररुपी अमृत तू मला प्यायला लावलेस.

शब्दार्थ

तिमिर =अंधार	रजनी=रात्र	निजणे= झोपणे
मदोन्मत्त = मद (अहंकार / अभिमान / घमण्ड) + उन्मत्त (उन्मादाने माजलेला)		
दातार= दाता =उदार, देणारा	प्राशन= पिणे	

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ४

त्याणें झालें मज चेत। ज्ञानसूर्यप्रकाश होत।
तुझे कृपेनें जागृत। जाहलों स्वामी सिद्धमुनि॥४॥

गद्यरुप :-

त्याने ज्ञानरुपी सूर्य प्रकाशित होऊन (मला जाणीव झाली) मी जागा झालो. हे सिद्ध मुनि ,तुझ्या कृपेने मी जागा झालो.

शब्दार्थ

चेत= जागृत= जागा, सावध

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ५

पुढील कथाविस्तारा ।निरोपावा योगीश्वरा।
कृपा करीं गा दातारा ।म्हणोनि लागला चरणांसी॥५॥

गद्यरुप :-

हे योगीश्वरा पुढील कथेचा विस्तार संदेशावा (सांगावा). अहो दातारा, माझ्यावर कृपा करावी." असे म्हणून (तो नामधारक शिष्य, सिद्धमुनिंच्या) पाया पडला.

शब्दार्थ

निरोप= संदेश, मजकूर	चरण= पाय
गा= अग, अरे (अहो)	दातार= दाता =उदार, देणारा

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ६

ऐकोनि शिष्याचें वचन। संतोषला सिद्ध आपण।
सांगतसे विस्तारून। श्रीगुरुमहिमा अनुपम्य॥ ६ ॥

गद्यरुप :-

शिष्याचे बोलणे ऐकून, सिद्धमुनि स्वतः आनंदीत झाले. अनुपम असलेला गुरुमहिमा विस्ताराने सांगू लागले.

शब्दार्थ

वचन= बोलणे	संतोषणे= समाधान पावणे, आनंदणे
अनुपम्य =अनुपम =ज्याला उपमा देता येत नाही ते	

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ७

शिष्योत्तमा नामांकिता। सांगेन ऐके गुरूची कथा।
औदुंबरतळीं अतिप्रीता । होते श्रीगुरु परियेसा॥ ७॥

गद्यरुप :-

“हे उत्तम शिष्य असलेल्या नामंकिता मी ऐकलेली गुरुची कथा तुला सांगेन. श्रीगुरुंना अतिशय प्रिय असलेल्या औदुंबर वृक्षाखाली श्रीगुरु रहात होते, हे ऐक.”

शब्दार्थ

शिष्योत्तमा= शिष्य + उत्तम	औदुंबर= उंबराचा वृक्ष
नामांकिता= श्रीगुरुचरित्रकार शिष्यास नामधारी शिष्य असे संबोधतात.	
परियसणे= ऐकणे	

ह्या ओवीतून ध्वनित होते की, सिद्धमुनी श्रीगुरुंबरोबर अमरापूर- नरसोबाची वाडी ह्या ठिकाणी नव्हते. सिद्धमुनिंना श्रीगुरुंचे सानिध्य परळी वैजनाथ क्षेत्री मिळाले(संदर्भ :-अध्याय १६वा). सिद्धमुनींनी ऐकलेल्या श्रीगुरुंच्या भूमीगत अवस्थेतील कथा नामधारक शिष्यास सांगितलेल्या आहेत.

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ८

ऐकोनि सिद्धाचें वचन। नामधारक करी प्रश्न।
अनेक पुण्यवृक्ष त्यजून । काय प्रीती औदुंबरीं॥८॥

गद्यरुप :-

सिद्धमुनीचे बोलणे ऐकून नामधारक शिष्याने सिद्धमुनीस प्रश्न केला, "अनेक पुण्यवृक्ष सोडून श्रीगुरुंची औदुंबरावर प्रीती का होती?"

शब्दार्थ

वचन= बोलणे	त्यजणे= सोडणे

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ९

अश्वत्थवृक्ष असे थोर। म्हणोनि सांगती वेद शास्त्र ।
श्रीगुरुप्रीति औदुंबर।कवण कारण निरोपावें॥ ९॥

गद्यरुप :-

अश्वत्थ (पिंपळ)वृक्ष खूप थोर आहे, असे वेदशास्त्रात सांगितले आहे. श्रीगुरुंच्या प्रीतीचा औदुंबर (उंबर) वृक्षच का ? याचे कोणते कारण ते सांगावे ?

शब्दार्थ

अश्वत्थ= पिंपळ	औदुंबर= उंबर	निरोप= संदेश

अश्वत्थ = अ + श्वत्थ = 'श्वः' पर्यन्त न तिष्ठति इति अश्वत्थ

(श्वः = उद्या / tomorrow)

= ज्याला उद्याला (भविष्य काळांत) अंत नाही, असा नित्य बदलणारा

ओवी क्रमांक १०

सिद्ध म्हणे नामांकिता। सांगेन याचिया वृत्तांता।
जधीं नरसिंह अवतार होता। हिरण्यकश्यप विदारिला॥ १० ॥

गद्यरुप :-

सिद्धमुनि नामांकिताला (शिष्याला) म्हणाले, "याचा वृतान्त तुला मी सांगेन. जेव्हा नरसिंहअवतार होता, त्याने (नरसिंहअवताराने) हिरण्यकश्यप (राक्षसराजा= भक्त प्रल्हादाचे वडिल) फाडला."

शब्दार्थ

जधी= जेव्हा	विदारणे= फाडणे, वधणे

ओवी क्रमांक ११

नखेंकरूनि दैत्यासी। विदारिलें कोपेसीं।
आंतडीं काढूनियां हर्षीं। घातली माळ गळां नरहरीने॥ ११ ॥

गद्यरुप :-

नरसिंहाने नखांनी राक्षसाला रागाने फाडले. (त्या राक्षसाची) आतडी बाहेर काढून नरहरीने अतिशय आनंदाने (त्या आतड्यांची) माळ (स्वतःच्या) गळ्यांत घातली.

शब्दार्थ

करुन = साधनाने, द्वारे	विदारणे= फाडणे
कोप=राग	हर्ष= अतिशय आनंद

ओवी क्रमांक १२

त्या दैत्याचे पोटीं। विष होतें काळकूटी।
जैसी वडवाग्नि मोठी। तैसें विष परियेसा॥ १२॥

गद्यरुप :-

त्या राक्षसाच्या पोटांत नाशकर्त्यालाही (नरसिंहालाही) कोड्यात टाकणारे विष होते. जसा समुद्राच्या पोटांत मोठा अग्नी असतो, तसे हे विष अग्नीप्रमाणे (आग आग करणारे) होते, हे ऐका.

शब्दार्थ

दैत्य=राक्षस	काळ=नाशकर्ता
कूट= कोडे	वडवाग्नि= समुद्राच्या पोटांतील मोठा अग्नी

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक १३

विदारण करितां दैत्यासी। वेधलें विष त्या नखांसी।

तापलीं नखें बहुवसी। ऐक शिष्या एकचित्तें॥ १३॥

गद्यरुप :-

"राक्षसाला फाडताच, (नरसिंहाच्या) त्या नखांना विष चिकटले. (नरसिंहाची) नखे खूप तापली (नखांची खूप आग व्हावयास लागली); शिष्या, तू एकचित्ताने ऐक."

शब्दार्थ

विदारणे= फाडणे	वेधणे= चिकटणे
तापणे = गरम होणे	बहुवस= खूप

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक १४

तये समयीं महालक्ष्मी । घेऊनि आली अतिप्रेमीं।

औदुंबरफळ नामी । शांतीकारणे नखांसी॥ १४॥

गद्यरुप :-

त्यावेळी महालक्ष्मी अतिशय प्रेमाने औदुंबर हे प्रसिद्ध फळ, नखांना शांत (थंड) करण्यासाठी घेऊनि आली.

शब्दार्थ

समय=वेळ	नामी= प्रसिद्ध

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक १५

तये वेळीं शीतलार्थ । नखें रोविलीं औदुंबरांत।
विषाग्नि झाला शांत ।उग्र नरसिंह शांत झाला॥ १५॥

गद्यरुप :-

त्यावेळी थंड करण्यासाठी, औदुंबराच्या फळात (नरसिंहाने) नखे खुपसली. विषाचा अग्नी (विषामुळे होणारी नखांची आग) शांत झाला, रागावलेला नरसिंह शांत झाला.

शब्दार्थ

शीतलार्थ=शीतल (थंड) + अर्थ	रोवणे= खुपसणे
विषाग्नि=विष +अग्नि	उग्र =रागीट

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक १६

शांत जाहला नृसिंहदेव । देता झाला लक्ष्मीसि खेंव।
संतोषोनि उभय देव । वर देती तये वेळीं॥ १६ ॥

गद्यरुप :-

नृसिंहदेव शांत झाला. त्याने लक्ष्मीला आलिंगन दिले. त्यावेळी आनंदित झालेल्या दोन्ही (लक्ष्मी व नृसिंहदेव) देवांनी (औदुंबर वृक्षाला) वर दिला.

शब्दार्थ

खेव = आलिंगन	उभय =दोघे
संतोषणे =समाधान पावणे, आनंदणे	

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक १७

तया समयीं औदुंबरासी। देती वर हृषीकेशी।
“सदा फळित तूं होसी। ‘कल्पवृक्ष' तुझें नाम॥ १७॥

गद्यरुप :-

त्यावेळी हृषीकेशीने औदुंबरास वर दिला. “तुला नेहमी फळ येतील व तुझे नाव कल्पवृक्ष होईल.

शब्दार्थ

कल्पवृक्ष= इच्छित वस्तू देणारा वृक्ष

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक १८

जे जन भजती भक्तीसीं । काम्य होय त्वरितेसीं।

तुज देखतांचि परियेसीं । उग्र विष शांत होय॥ १८॥

गद्यरुप :-

“जे भक्त भक्तीने तुला भजतील, त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण लवकर होतील. तुला पहाताच उग्र विष शांत झालेल, तू ऐकशील.”

शब्दार्थ

काम्य =इच्छा धरुन केलेले	
त्वरित= लवकर	परियसणे= ऐकणे

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक १९

जे सेवितील मनुष्यलोक। अखिलकाम्य पावोनि ऐक।
फळ प्राप्त होय निके। पापावेगळा होय नर॥ १९ ॥

गद्यरुप :-

जे मनुष्यलोक (जी माणसे) तुझी सेवा करतील, त्यांच्या मनात धरलेल्या सर्व इच्छा पूर्ण होऊन त्यांना चांगले फळ प्राप्त होईल आणि असा मनुष्य पापापासून मुक्त होईल.

शब्दार्थ

सेवित= ज्याची सेवा केली आहे असा	निका= चांगला
अखिल= सर्व, संपूर्ण	काम्य= इच्छा धरुन केलेले

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक २०

वांझ नारी सेवा करितां। पुत्र होतील तिसी त्वरिता।
जे नर असतील दैन्यपीडिता। सेवितां होतील श्रियायुक्त॥ २०॥

गद्यरुप :-

वांझ स्त्रीने तुझी सेवा केल्यास तिला त्वरित पुत्र प्राप्ती होईल. जे नर गरिबीमुळे त्रासले असतील, त्यांनी तुझी सेवा केल्यास ते श्रीमंत होतील.

शब्दार्थ

वांझ= संतान न होणारी स्त्री	दैन्य=गरिबी
पीडणे= त्रासणे	श्रिया=लक्ष्मी, संपत्तीची देवता

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक २१

तुझे छायीं बैसोन। जे जन करिती जपानुष्ठान।
अनंत फळ होय ज्ञान। कल्पिलें फळ होय त्यांसी॥ २१ ॥

गद्यरुप :-

जे लोक तुझ्या सावलीत बसून जपानुष्ठान करतील, त्यांना मिळणारे अनंत फळ हे त्यांना प्राप्त झालेले ज्ञान असेल. त्या ज्ञानामुळे इच्छित फलप्राप्ती होईल.

शब्दार्थ

छाया= सावली	कल्पणे= कल्पना करणे

ओवी क्रमांक २२

तुझे छायीं जळांत। स्नान करितां पुण्य बहुत।
भागीरथीस्नान करीत। तितुकें पुण्य परियेसा॥ २२ ॥

गद्यरुप :-

तू (औदुंबर वृक्ष) दर्शवित असलेल्या पाण्यात स्नान केल्यास, खूप पुण्य मिळेल. हे पुण्य गंगास्नाना इतके असते, हे ऐका.

शब्दार्थ

छाया= सूचक चिन्ह	बहुत= खूप
भागीरथी= गंगा	परियसणे= ऐकणे

औदुंबराची (उंबराची) झाडे पाण्याच्या जागी उगवतात. औदुंबर वृक्ष जमीनीखाली असलेल्या पाण्याचे सूचक चिन्ह आहे.

पुराणांतील नृसिंहदेवाची ही कथा जमिनीतील औदुंबराच्या सानिध्यात मिळणारा पाणी साठा आंघोळ करण्यास योग्य आहे, हे सूचित करताना दिसते.

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक २३

तुज सेविती त्या नरासी। व्याधि नव्हती कवणे दिवसीं।
ब्रह्महत्यादि महादोषी ।परिहार होती परियेसा॥ २३ ॥

गद्यरुप :-

तुला जो मनुष्य खातो (तुझी फळे जो मनुष्य खातो), त्याला कोणत्याही दिवशी आजार होत नाही. तसेच तुझी सेवा जो मनुष्य करतो, त्याचे ब्रह्महत्या इत्यादी महादोष दूर होतात, हे ऐका.

शब्दार्थ

सेवित= खाल्लेला	नर= मनुष्य	व्याधि= रोग आजार
कवण= कोणता	परिहार= दूरीकरण	परियसणे= ऐकणे

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक २४

जें जें कल्पूनि मानसीं। तुज सेविती भावेसीं।
कल्पना पुरती भरंवसीं। कलियुगीं कल्पवृक्ष तूंचि॥ २४॥

गद्यरुप :-

जे मनांत निश्चय करुन, तुझी भक्तिभावाने सेवा करतात, त्यांची मनात केलेली योजना (इच्छा)खात्रीने पूर्ण करणारा कलियुगातला कल्पवृक्ष तूच असशील.

शब्दार्थ

कल्प= निश्चय	सेवित = ज्याची सेवा केली आहे असा
मानस= मन	कल्पना =मनात केलेली योजना
भरंवसा(हिंदी) = भरोसा= विश्वास	
कल्पवृक्ष= इच्छित वस्तू देणारा वृक्ष	

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक २५

सदा वसों तुजपाशी। लक्ष्मीसहित शांतीसीं"।
म्हणोनि वर देती हर्षीं। नरसिंहमूर्ति तये वेळीं॥२५॥

गद्यरुप :-

आम्ही (नृसिंहदेव) लक्ष्मी सहित तुझ्याजवळ स्वस्थ चित्ताने सदैव राहू." असे म्हणून त्यावेळी नरसिंहमूर्ति अतिशय आनंदाने आशीर्वाद देतात.

शब्दार्थ

वसणे= राहणे	लक्ष्मी=संपत्तीची देवता	शांती=चित्ताची स्थिरता
हर्ष= अतिशय आनंद		

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक २६

ऐसा वृक्ष औदुंबरु ।कलियुगीं तोचि कल्पतरु।
नरसिंहमूर्ति होता उग्रु । शांत झाली तयापाशीं॥ २६ ॥

गद्यरुप :-

असा औदुंबर वृक्ष कलियुगातील कल्पवृक्षच आहे. नरसिंहमूर्तिला असह्य झालेली उष्णता त्याच्यापायी (औदुंबराच्या फळाने) शांत झाली.

शब्दार्थ

औदुंबर=उंबराचे झाड	कल्पतरु= इच्छित वस्तू देणारा वृक्ष
उग्र (संस्कृत) =दुःसह, उष्ण	

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक २७

याकारणें श्रीगुरुमूर्ति । नृसिंहमंत्र उपासना करिती।
उग्रत्वाची करावया शांति । औदुंबरीं वास असे॥ २७॥

गद्यरुप :-

याकारणासाठी श्रीगुरुमूर्ति नृसिंहमंत्राची उपासना करित असत. भयंकर गोष्टी थांबविण्यासाठी श्रीनृसिंहदेवाचे तिथे (औदुंबर वृक्षाखाली) वास्तव्य असते.

शब्दार्थ

उग्र= भयंकर	शांति= थांबणे	वास= राहणे

भावार्थ :- अनाचार माजविणाऱ्या हिरण्यकश्यप राक्षसाचा वध करुन समाजात घडणाऱ्या भयंकर गोष्टी श्रीनृसिंहदेवाने थांबविल्या.

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक २८

अवतार आपण तयाचे । स्थान आपुलें असे साचें ।
शांतवन करावया उग्रत्वाचें । म्हणोनि वास औदुंबरीं॥ २८॥

गद्यरुप :-

आपण (श्रीगुरु) त्याचे (श्रीनृसिंहदेवाचे) अवतार असल्याने, आपले खरे (शाश्वत) स्थान औदुंबर वृक्ष (उंबराचे झाड) आहे. भयंकर (अनाचारी) समाजात शांतियुक्त वन निर्माण करण्यासाठी, आपले (श्रीगुरुंचे) औदुंबर वृक्षाखाली वास्तव्य असते.

शब्दार्थ

साचे= खरे	शांत=शांतियुक्त	उग्र=भयंकर

भावार्थ :- भारतातील परधर्मीय राजवटीने निर्माण केलेली हिंदूधर्मांची भयंकर परिस्थिती थांबविण्याचे काम, श्रीगुरु-नृसिंह सरस्वतींनी औदुंबर वृक्षाखाली राहून केलेले आहे.

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक २९

सहज वृक्ष तो औदुंबर । कल्पवृक्षसमान तरु।
विशेषें वास केला श्रीगुरु । कल्पिलीं फळें तेथें होतीं॥ २९॥

गद्यरुप :-

कल्पवृक्षासारखे असलेले औदुंबर (वृक्ष) हे स्वभावसिद्ध (नैसर्गिक) झाड आहे. श्रीगुरुंनी वास केल्याने, विशेष फळे (धर्मविधी सांगणारे वेदांग) तेथे (औदुंबर वृक्षाखाली) होती.

शब्दार्थ

सहज= स्वभावसिद्ध	कल्पवृक्ष=इच्छित वस्तू देणारा वृक्ष
तरु= वृक्ष, झाड	कल्प= धर्मविधी सांगणारे वेदांग

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ३०

तया कल्पद्रुमातळीं । होते श्रीगुरु स्तोममौळी।
ब्रह्मा-विष्णु-नेत्रभाळी । देह मानुषी धरोनियां॥ ३०॥

गद्यरुप :-

शिवशंकराचा अवतार असलेल्या श्रीगुरुंचा त्या कल्पवृक्षास (औदुंबरास) स्पर्श झालेला आहे. श्रीगुरु हे ब्रह्मा, विष्णु व महेश (श्रीशंकर) यांचा मनुष्य देह धारण केलेला अवतार आहे.

शब्दार्थ

कल्पद्रुमातळी= कल्पद्रुम् + आतळी
कल्पद्रुः (संस्कृत)= कल्पवृक्ष
आतळणे (प्राकृत क्रियापद)= स्पर्श करणे
नेत्रभाळी = ज्याच्या कपाळावर (तिसरा) नेत्र (डोळा) आहे असा = श्रीशंकर
स्तोममौळी= ज्याच्या स्तौम (डोक्यावर) मौळी (जटा) आहेत असा

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ३१

भक्तजनां तारणार्थ । पावन करिती समस्त तीर्थ।

अवतार त्रयमूर्ति गुरुनाथ । भूमीवरी वर्तत असे॥ ३१ ॥

गद्यरुप :-

भक्तजनांना तारण्यासाठी सर्व तीर्थांना पावन करतात.

त्रिमुर्तिंचा भूमीवर गुरुनाथ हा अवतार घडलेला आहे (झालेला आहे).

शब्दार्थ

तारणार्थ=तारण +अर्थ	समस्त= सर्व
पावन =शुद्ध, निर्दोष	वर्तणे= घडणे

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ३२

वृक्षातळीं अहर्निशीं। श्रीगुरु असती गौप्येसीं।
माध्यान्हकाळसमयासी। समारंभ होय तेथें॥३२॥

गद्यरुप :-

औदुंबराखाली रात्रंदिवस श्रीगुरु रहात गुप्त रुपात भूमीगत असत. दुपारच्या वेळी तिथे (औदुंबर वृक्षाखाली) समारंभ होत असे.

शब्दार्थ

तळ=खालचा भाग	माध्यान्ह=दुपार
गौप्य=गुप्त गोष्ट	समय= वेळ

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ३३

अमरेश्वरसंनिधानीं । वसती चौसष्ट योगिनी।

पूजा करावया माध्यान्हीं । श्रीगुरुजवळी येती नित्य॥ ३३॥

गद्यरुप :-

अमरेश्वराजवळ चौसष्ट योगिनी (जोगीणी) रहात असत. दुपारी पूजा करण्यासाठी त्या नेहमी श्रीगुरुजवळ येत असत.

शब्दार्थ

संनिधान=जवळ	माध्यान्ह= दुपारी
नित्य= नेहमी	योगिनी =जोगीण= बैरागीण, जोग्याची बायको

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ३४

नमन करूनि श्रीगुरुसी । नेती आपुले मंदिरासी।
पूजा करिती विधीसीं । गंधपरिमळ -कुसुमें॥ ३४॥

गद्यरुप :-

श्रीगुरुंना नमन करुन आपल्या घरी नेत असत.

(आपल्या घरी) त्या श्रीगुरुंची सुगंधित गंध-फूलांनी विधीवत पूजा करीत असत.

शब्दार्थ

मंदिर= घर	परिमळ=सुगंध	कुसुम=फूल

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ३५

आरोगोनि तयां घरीं ।पुनरपि येती औदुंबरीं।
एके समयीं द्विजवरी । विस्मय करिती देखोनियां॥ ३५॥

गद्यरुप :-

त्यांच्या घरी भोजन करुन औदुंबर वृक्षापाशी परत येत असत. एकदा (ब्राह्मण श्रेष्ठांनी ही घटना पाहिली,) ब्राह्मणश्रेष्ठांना ही घटना पाहून आश्चर्य वाटले.

शब्दार्थ

आरोगण= भोजन	पुनरपि= पुनः + अपि = परत	
द्विज= ब्राह्मण	वर=श्रेष्ठ	विस्मय= आश्चर्य

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ३६

म्हणती अभिनव यति कैसा । न करी भिक्षा ग्रामांत ऐसा।
असतो सदा अरण्यवासा । कवणेपरी काळ कंठी॥ ३६ ॥

गद्यरुप :-

ते (ब्राह्मण) म्हणाले,"हा नवीन आलेला योगी असा कसा? गावात भिक्षा मागत नाही. सदा अरण्यात असतो, तो कशाप्रकारे काळ कंठतो ?"

शब्दार्थ

अभिनव= नवीन,अपूर्व	ग्राम=गाव
कंठणे = दुःखाने काळ काढणे	

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ३७

पाहूं याचें वर्तमान । कैसा क्रमितो दिनमान।
एखादा नर ठेवून । पाहो अंत यतीश्वराचा॥३७॥ 37

गद्यरुप :-

याची खबर पाहूया (काढुया). दिवसाचा वेळ (हा योगी) कसा घालवतो? एखादा मनुष्य (पाळतीवर) ठेवून, यतीश्वराची ताकद काय आहे? ते पाहूया.

शब्दार्थ

वर्तमान= खबर	क्रमणे= वेळ घालविणे
नर= मनुष्य	अंत= ताकद

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ३८

ऐसें विचारूनि मानसीं । गेले संगमस्थानासी ।
माध्यान्हसमयीं तयासीं। भय उपजलें अंतःकरणीं॥ ३८॥

गद्यरुप :-

असा मनाशी विचार करुन ते ब्राह्मण दुपारच्या वेळी संगमस्थानावर गेले. त्यांच्या अंतःकरणांत भिती निर्माण झाली.

शब्दार्थ

मानस=मन	माध्यान्ह=दुपार	समय= वेळ

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ३९

पाहूं म्हणती श्रीगुरुचा अंत । तेचि जाती यमपंथ ।
ऐसे विप्र मदोन्मत्त । अधोगतीचे तेचि इष्ट॥३९॥

गद्यरुप :-

जे श्रीगुरुंची ताकद पाहू म्हणतात, ते यातनेच्या पंथाला लागतात. अशा मदाने (उन्मत्तपणाने) उन्मत्त झालेल्या ब्राह्मणांची होणारी अधोगती त्या ब्राह्मणांसाठी योग्य आहे.

शब्दार्थ

अंत =ताकद	विप्र= ब्राह्मण	इष्ट= हितावह (योग्य)
यम(संस्कृत)=मृत्युदेवता, प्राण्यास दुष्कर्मांबद्दल यातना देणारी देवता		
मदोन्मत्त = मद (अहंकार / अभिमान / घमण्ड) + उन्मत्त (उन्मादाने माजलेला)		

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ४०

उपजतां भय ब्राह्मणांसी । गेले आपुले स्थानासी ।
गंगानुज थडियेसी । होता वृत्ति राखीत ॥ ४० ॥

गद्यरुप :-

ब्राह्मणांच्या मनांत (असे) भय निर्माण झाल्याने ते आपल्या स्थानाला घरी निघून गेले. तिथे एक नदीकिनारी रहाणारा मनुष्य आपले शेत राखीत होता.

शब्दार्थ

उपजणे= उद्भवणे	थड= तीर	वृत्ति= शेत
गंगानुज = गंगा +अनु (संस्कृत) जवळ +ज (उत्पन्न झालेला) = गंगेच्या बाजूला जन्मालाआलेला = त्या नदीकाठचा रहिवासी		

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ४१

त्याणें देखिलें श्रीगुरुसी । आल्या योगिनी पूजेसी।
गंगेमध्यें नेतां कैसी । मार्ग जाहला जळांत॥ ४१ ॥

गद्यरुप :-

त्याने श्रीगुरुंना व श्रीगुरुंच्या पूजेसाठी आलेल्या योगिनींना पाहिले. श्रीगुरुंना नदीत नेताच (श्रीगुरु नदीत जाताच) पाण्यात कसा काय मार्ग तयार झाला?

शब्दार्थ

योगिनी= जोगिनी= बैरागीनी, जोग्याची बायको	
कैसी= कसा	जळ=पाणी

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ४२

विस्मय करी तो नरु । म्हणे कैसा यतीश्वरु।
द्विभाग झाला गंगापूरु । केवीं गेले गंगेत॥४२॥

गद्यरुप :-

तो मनुष्य नवल करित (स्वतःशी) म्हणाला, "हा यतीश्वर असा कसा? पूर्ण नदी दोन भागांत दुभंगली गेली. नदीत हे लोक (श्रीगुरु व ६४ योगिनी) कशासाठी गेले आहेत ?

शब्दार्थ

विस्मय= नवल	नर= मनुष्य	द्विभाग= दोन भाग
पूर= पूर्ण	केवी= कसे ?	

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ४३

श्रीगुरुतें नेऊनि । पूजा केली त्या योगिनीं।
भिक्षा तेथें करुनि । आले मागुती बाहेर ॥ ४३ ॥

गद्यरुप :-

श्रीगुरुंना नदीत नेऊन त्या योगिनींनी श्रीगुरुंची पूजा केली. तेथे श्रीगुरुंना भिक्षा देऊन परत गंगेच्या बाहेर (सर्वजण) आले.

शब्दार्थ

मागुती= परत

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ४४

पहात होता गंगानुज। म्हणे कैसें जाहलें चोज ।
अवतार होईल ईश्वरकाज। म्हणोनि पूजिती देवकन्या ॥ ४४ ॥

गद्यरुप :-

हे सर्व दृश्य गंगानुज (नदीकाठचा रहिवासी) पहात होता, तो (स्वतःशीच) म्हणू लागला, "हे असे कसे नवल झाले? हा अवतार होण्याचे कारण ईश्वर असेल, म्हणून ह्या देवकन्या त्याची पूजा करीत असतील."

शब्दार्थ

गंगानुज = गंगा +अनु (संस्कृत) जवळ +ज (उत्पन्न झालेला) = गंगेच्या बाजूला जन्मालाआलेला = त्या नदीकाठचा रहिवासी	
चोज= नवल	काज= काम, कारण
होईल :- हा शब्दातून 'ही व्यक्ती अवतार होईल' असा शब्दशः अर्थ नसावा. गंगानुजाच्या मनातील विचार : 'ईश्वरी संकेतानुसार श्रीगुरु हा अवतार झाला' असे श्रीगुरुचरित्रकारांना सांगावयाचे असावे. अवतार : देवादिकांचे अन्यरुपाने पृथ्वीवर येणे.	

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ४५

येरे दिवसीं मागुती । हातीं घेऊन आरति ।
देवकन्या ओंवाळिती । श्रीगुरूतें नमूनियां ॥४५॥

गद्यरुप :-

दुसऱ्या दिवशी पुन्हा हातांत आरती घेऊन, त्या देवकन्या श्रीगुरुंना नमस्कार करुन ओवाळीत होत्या.

शब्दार्थ

येर =दुसरा	मागुता= पुन्हा

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ४६

पुन्हा गंगाप्रवाहांत । श्रीगुरु निघाले योगिनींसहित।
जो कां नर होता पहात । तोही गेला सवेंचि ॥ ४६ ॥

गद्यरुप :-

पुन्हा नदीच्या प्रवाहात योगिनींसह श्रीगुरु निघाले. ज्या मनुष्याने (गंगानुज=नदीकाठचा रहिवासी) हे दृष्य (आदल्या दिवशी पाहिले होते), तो मनुष्यही त्यांच्या बरोबर (श्रीगुरु व योगिनींबरोबर) नदीच्या प्रवाहात गेला.

शब्दार्थ

गंगा=नदी	नर=मनुष्य	सवे= बरोबर

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ४७

नदीतीरीं जातां श्रीगुरु । द्विभाग जाहलें गंगेत द्वारु।
भीतरीं दिसे अनुपम्य पुर । रत्नखचित गोपुरेंसीं॥४७॥

गद्यरुप :-

श्रीगुरु नदीतीरावर जाताच नदीचे (गंगेचे पाणी) दुभंगले. नदीच्या प्रवाहाच्या आत रत्नजडित वेस असलेले अनुपम नगर दिसायला लागले.

शब्दार्थ

अनुपम्य= अनुपम= ज्याला उपमा देता येत नाही असे			
भीतरी =आत	पुर= नगर	खचित=जडित	गोपुर= वेस

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ४८

अमरावतीसमान नगर । जैसा तेजें दिनकर।
श्रीगुरु जातांचि समस्त पुर । घेऊनि आलें आरति॥ ४८॥

गद्यरुप :-

जसा सूर्य तेजपुंज दिसतो, तसे तेजपुंज दिसणारे इंद्राच्या नगरी सारखे ते नगर होते. श्रीगुरु त्या नगरापाशी जाताच, संपूर्ण नगर आरती घेऊन (नगराच्या वेशीवर) आले.

शब्दार्थ

अमरावती=इंद्राची नगरी		दिनकर= सूर्य
समस्त= सर्व सगळे	पुर= नगर	आरती =ओवाळण्याचे दीपपात्र

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ४९

ओंवाळून आरति। नेलें आपुले मंदिराप्रति।
सिंहासन रत्नखचितीं। बैसों घालिती तया समयीं॥ ४९ ॥

गद्यरुप :-

श्रीगुरुंना आरतीने ओवाळून, त्यांनी आपल्या देवालयाकडे नेले. त्यावेळी त्या लोकांनी रत्नजडित सिंहासनावर (श्रीगुरुंसाठी) बैठक घातली.

शब्दार्थ

मंदिर=देवालय, गृह	प्रति (संस्कृत) = कडे
खचित=जडित	बैसणी (प्राकृत)= बैठक

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ५०

पूजा करिती विधीसीं। जे कां उपचार षोडशी।
अनेकापरी षड्रसेसीं। आरोगिलें तये वेळीं॥५०॥

गद्यरुप :-

षोडशोपचार पूजेतील १६ प्रकारचे उपचार असतात, त्या विधींनी युक्त अशी (श्रीगुरुंची त्या नदीपात्रातील नगरवासींनी) पूजा केली. त्यावेळी त्यांना श्रीगुरुंना अन्नाचे सहाही रस (चवी) असलेले अनेकप्रकारचे पदार्थ भोजनांत वाढले.

शब्दार्थ

षोडश= सोळा	आरोगण (प्राकृत)= भोजन
षड्रस= षड्‌रस= कटू (कडू, तिखट) आम्ल (अम्ल= अंबट), मधुर (गोड), लवण (मीठ, क्षार), तिक्त (तिखट, कडू) आणि कषाय (काढा) हे अन्नाचे मुख्य सहा रस.	

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ५१

श्रीगुरु दिसती तया स्थानीं । त्रैमूर्ति जैसा शूलपाणि।
पूजा घेऊनि तत्क्षणीं । मग परतले तयेवेळीं॥५१॥

गद्यरुप :-

जसा त्रिमुर्ति रुपांत श्रीशंकर दिसेल तसे श्रीगुरु त्या स्थानावर दिसत होते. त्यावेळी पूजा झाल्यावर, श्रीगुरु त्या क्षणी परतले.

शब्दार्थ

त्रैमूर्ति= त्रिमुर्ति	शूलपाणि= श्रीशंकर
तत्क्षणी= तद् + क्षणी= त्या क्षणी	

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ५२

देखोनियां तया नरासी । म्हणती तूं कां आलासी।
विनवी तो नर स्वामियासी । सहज आलों दर्शनातें। ॥५२॥

गद्यरुप :-

त्या मनुष्याला पाहून श्रीगुरुंनी (त्याला) विचारले "तू का आला होतास ?" तो मनुष्य स्वामींना (श्रीगुरुंना) विनवू लागला, "मी सहज दर्शन (घेण्या)साठी आलो होतो."

शब्दार्थ

नर= मनुष्य

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ५३

म्हणोनि लागला गुरुचरणीं । तल्लीन होवोनि अंतःकरणीं।

म्हणे स्वामी गिरिजारमणा । होसी त्रयमूर्ति तूंचि एक॥ ५३ ॥

गद्यरुप :-

असे म्हणून तो मनुष्य गुरुंच्या पाया पडला. अंत:करणात तल्लीन होऊन म्हणाला,"स्वामी, श्रीशंकरा(पार्वतीचे पति) तूच तो एक त्रिमूर्ति आहेस."

शब्दार्थ

चरण= पाय	गिरिजा=गिरीत (हिमालय पर्वतात) जन्माला आलेली
रमण= पति	त्रयमूर्ति= तीन मुर्ति= ब्रह्मा, विष्णु आणि महेश

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ५४

न कळे तुझें स्वरुपज्ञान ।संसारमाया वेष्टून।
तूं तारक या भवार्णीं ।उद्धरावें स्वामिया॥५४॥

गद्यरुप :-

“मी संसार गुरफटल्यामुळे, तुझ्या स्वरुपाचे ज्ञान मला समजले नाही.तू या भवसागरात आमचा रक्षक आहेस. स्वामी, तुम्ही आम्हाला उद्धरावे.”

शब्दार्थ

वेष्टणे= वेढणे	भव= संसार	अर्णव= सागर

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ५५

तूं तारक विश्वासी । म्हणोनि भूमीं अवतरलासी।
अज्ञान म्हणिजे रजनीसी । ज्योतिःस्वरूप तूंचि एक॥५५॥

गद्यरुप :-

तूच ह्या विश्वाचा तारक आहेस म्हणून तू भूमीवर अवतरलास. अज्ञान म्हणजे रात्रीच्या अंधकारासारखे असून तूच एक ज्योतिस्वरूपात (प्रकाशाची ज्योत) आहेस.

शब्दार्थ

रजनी=रात्र

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ५६

तुझें दर्शन होय ज्यासी । सर्वाभीष्ट फळ होय त्यासी ।
इहपर अप्रयासीं । जोडे नरा न लागतां क्षण॥ ५६ ॥

गद्यरुप :-

तुझे दर्शन ज्याला होईल त्याला सर्व कल्याणकारी फळ मिळेल. ह्या पृथ्वीवर (इहपर) श्रम न करता, त्या माणसाला क्षणाचाही वेळ न लागता (सर्व कल्याणाचा) फायदा होतो.

शब्दार्थ

सर्वाभीष्ट=सर्व +अभीष्ट (कल्याण)	जोड= फायदा

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ५७

ऐशापरी तो देखा । स्तुति करितो नर ऐका ।

संतोषूनि गुरुनायकें । आश्वासिलें तया वेळीं ॥५७॥

गद्यरुप :-

अशाप्रकारे तो मनुष्य स्तुति करताना दिसत होता, हे ऐका.त्यावेळी संतोषिलेल्या श्रीगुरुनायकानी (श्रीगुरुंनी) त्याला आश्वासन दिले.

शब्दार्थ

संतोष= समाधान

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ५८

श्रीगुरु म्हणती तयासी । तुझें दैन्य गेलें परियेसीं ।
जें जें तूं इच्छिसी मानसीं। सकळाभीष्ट पावशील॥५८॥

गद्यरुप :-

श्रीगुरु त्याला म्हणाले, "तुझे दैन्य गेलेले, तू ऐकशील. तू ज्या ज्या गोष्टींची मनांत इच्छा करशील, त्या सर्व इच्छित वस्तू तुला मिळतील."

शब्दार्थ

दैन्य= दारिद्य	परियसणे= ऐकणे	मानस=मन
सकळाभीष्ट=सकळ(सर्व)+ अभीष्ट (इच्छिलेल्या वस्तू)		

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ५९

येथील वर्तमान ऐसी । न सांगावे कवणासी ।

जया दिवशीं प्रगट करिसी। तूतें हानी होईल जाण॥५९॥

गद्यरुप :-

येथील अशीही बातमी तू कोणाला सांगू नयेस. ज्या दिवशी तू (प्रगट करशील) दुसऱ्याला सांगशील त्यादिवशी तुझी हानी होईल, हे जाण.

शब्दार्थ

वर्तमान= बातमी, खबर	कवण=कोण ?

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ६०

येणेंपरी तयासी । श्रीगुरु सांगती परियेसी ।
आले औदुंबरापाशीं। गंगानुज - समागमें॥ ६० ॥

गद्यरुप :-

अशाप्रकारे श्रीगुरुंनी त्याला सांगितले, असे आम्ही (श्रीगुरुचरित्रकारांनी) ऐकलेले आहे (निश्चित पुरावा हातात नाही). श्रीगुरु गंगानुजाबरोबर (नदीकाठच्या रहिवाश्याबरोबर) औदुंबरापाशी आले.

शब्दार्थ

परियसणे= ऐकणे	समागम=बरोबर
गंगानुज = गंगा +अनु (संस्कृत) जवळ +ज (उत्पन्न झालेला) = गंगेच्या बाजूला जन्मालाआलेला = त्या नदीकाठचा रहिवासी	

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ६१

श्रीगुरुचा निरोप घेऊन। गेला गंगानुज आपण।
वृत्तिस्थानीं जातांचि क्षण। निधान त्यासी लाधलें॥ ६१ ॥

गद्यरुप :-

श्रीगुरुंचा निरोप घेऊन, गंगानुज (नदीकाठचा रहिवासी) आपल्या पोटाचा धंदा असलेल्या शेतापाशी आला. त्याचक्षणी त्याला खजिना मिळाला.

शब्दार्थ

गंगानुज = गंगा +अनु (संस्कृत) जवळ +ज (उत्पन्न झालेला) = गंगेच्या बाजूला जन्मालाआलेला = त्या नदीकाठचा रहिवासी	
वृत्ति=पोटाचा धंदा= नदीकाठची शेती	निधान= खजिना

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ६२

ज्ञानवंत तो झाला नरु। नित्यसेवा करी तो गुरु।

पुत्रपौत्र श्रियाकरु। महानंदे वर्ततसे॥ ६२ ॥

गद्यरुप :-

तो मनुष्य ज्ञानवंत झाला .तो नेहमी गुरुसेवा करित असे. त्या माणसाला (मिळालेल्या खजिनारुपी) संपत्तीमुळे, मुले-नातवंडे त्याच्याशी खूप आनंदाने वागायला लागली.

शब्दार्थ

नर= मनुष्य	नित्य= नेहमी
पुत्र=मुलगा	पौत्र=मुलांची मुले= नातवंडे
श्रिया=संपत्ती	करुन= मुळे
महानंद=महा (खूप) +आनंद	वर्तन= वागणे

भावार्थ:- पैसा असेल तर सर्व नाती गोड असतात.

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ६३

भक्तिभावें श्रीगुरूसी । नमन करी प्रतिदिवसीं।

सेवा करी कलत्रेंसीं । एकोभावेंकरूनियां॥ ६३ ॥

गद्यरुप :-

दररोज भक्तिभावाने (तो मनुष्य) श्रीगुरुंना नमन करित असे. आपल्या पत्नीसह एकचित्ताने भक्तीभावाने श्रीगुरुंची सेवा करित असे.

शब्दार्थ

प्रति= दररोज	कलत्र=विवाहाची स्त्री (पत्नी)

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ६४

वर्ततां ऐसें एके दिवसीं । आली पौर्णिमा माघमासीं ।
नमन करूनि श्रीगुरूसी । विनवीतसे तो भक्त॥ ६४॥

गद्यरुप :-

असे दिवस चाललेले असताना, एक दिवस माघ महिन्यांतील पौर्णिमा आली. श्रीगुरुंना नमन करुन तो भक्त विनवू लागला.

शब्दार्थ

वर्तणे= चालू असणे	मास=महिना

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ६५

म्हणे स्वामी जगद्गुरु । माघस्नानीं प्रयाग थोरु।
म्हणोनि सांगती द्विजवरु । काशीपुर महाक्षेत्र॥ ६५॥

गद्यरुप :-

(गंगानुज) म्हणाला,"हे जगाचा गुरु असलेल्या स्वामी, काशीनगर महाक्षेत्र असून, प्रयाग माघ महिन्यातील स्नानासाठी श्रेष्ठ आहे, असे ब्राह्मणश्रेष्ठ सांगतात."

शब्दार्थ

थोर= श्रेष्ठ	द्विज=ब्राह्मण	वर= श्रेष्ठ

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ६६

कैसें प्रयाग गयास्थान। कैसें वाराणसी भुवन ।
नेणों आपण यातिहीन। कृपा करणें स्वामिया ॥ ६६ ॥

गद्यरुप :-

"प्रयाग, गयास्थान कसे आहे? वाराणशीचे जग कसे आहे? मी हीन खालच्या जातीचा असल्याने, ह्या स्थानांविषयी जाणत नाही (मला माहिती नाही). स्वामी, आपण माझ्यावर कृपा करावी."

शब्दार्थ

भुवन= जग	नेणणे= न जाणणे
याति=जात	हीन=नीच, कमी प्रतीचे

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ६७

श्रीगुरु म्हणती तयासी। पंचगंगासंगमेंसी।
'प्रयाग' जाणावें भरंवसीं। 'काशीपुर' ते 'जुगुळ' ॥ ६७ ॥

गद्यरुप :-

श्री गुरु त्याला म्हणाले,"पंचगंगा संगमाला विश्वासाने प्रयाग समजावे. जुगुळ म्हणजे काशीपूर होय."

शब्दार्थ

भरंवसा (हिंदी भरोसा)= विश्वास

जुगुळ गांव : महाराष्ट्रातील अमरापूर पासून जुगुळ हे गाव ९७.५ कि मीटर अंतरावर (अथणी तालुका, बेळगांव जिल्हा) कर्नाटकात आहे.

पंचगंगा संगम=नरसोबाची वाडी (जिल्हा सांगली)

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ६८

दक्षिण 'गया' कोल्हापुर। त्रिस्थळ ऐसें मनोहर।
जरी पहासी प्रत्यक्षाकार। दावीन तुज चाल आतां॥ ६८॥

गद्यरुप :-

दक्षिण गया म्हणजे कोल्हापूर असून (पंचगंगासंगम, जुगुळ व कोल्हापूर)अशीही ही तीनही स्थळे मनोहर आहेत. जर तुला त्यांचे (प्रयाग, गया, वाराणशी ह्या तीनही स्थानांचे) प्रत्यक्ष स्वरुप पहावयाचे असेल, तर मी तुला ते दाखवीन, आता माझ्याबरोबर चल.

शब्दार्थ

त्रि=तीन	प्रत्यक्षाकार=प्रत्यक्ष +आकार (स्वरुप)

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक

बैसले होते व्याघ्राजिनीं। धरीं गा मागें दृढ करूनि।
मनोवेगें तत्क्षणीं । गेले प्रयागा प्रातःकाळीं॥ ६९ ॥

गद्यरुप :-

श्रीगुरु वाघाच्या कातड्यावर बसले होते (व म्हणाले), "अरे, माझ्या मागे घट्ट धरुन बस." त्याचक्षणी मनाच्या वेगाने प्रात:काळी (पहाटे) ते प्रयाग येथे गेले.

शब्दार्थ

व्याघ्र=वाघ	जीन= पलाण= आच्छादन
गा= अरे	प्रातःकाळ= पहाट

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ७०

तेथें स्नान करूनि। गेले काशीस माध्याह्नीं।
विश्वनाथा दाखवूनि। सवेंचि गेले गयेसी॥७०॥

गद्यरुप :-

तेथे (प्रयाग येथे) स्नान करुन ते दुपारी काशीस गेले.
मला विश्वनाथ दाखवून (विश्वनाथाचे दर्शन घडवून),
लगेचच ते गयेला गेले.

शब्दार्थ

माध्याह्न= दुपार	सवे=लगेच

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ७१

ऐसी त्रिस्थळी आचरोनि। आले परतोनि अस्तमानीं।
येणेंपरी तयास्थानीं। देखता झाला तो नर ॥ ७१ ॥

गद्यरुप :-

अशी त्रिस्थळी यात्रा करुन ते (दोघे) संध्याकाळी परत आले. अशाप्रकारे (मनाच्या वेगाने वाघाच्या कातड्यावर बसून) त्याच्या स्थानावर (पंचगंगासंगमावर) (आपण परत आल्याचे पाहून) तो मनुष्य पहातच राहिला.

शब्दार्थ

अस्तमान= संध्याकाळ	नर= मनुष्य

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ७२

विश्वनाटक श्रीगुरुमूर्ति। प्रकट झाली ऐसी कीर्ति।
श्रीगुरु मनीं विचारिती। आतां येथे गौप्य व्हावें॥ ७२ ॥

गद्यरुप :-

विश्वाच्या नाटकात (विश्वाच्या मंचावर), श्रीगुरुमुर्ति प्रकट झाली आहे; अशी श्रीगुरुंची किर्ती झाली. श्रीगुरुंनी मनाशी विचार केला,आता गुप्त (भूमीगत) व्हावे.

शब्दार्थ

गौप्य= गुप्त गोष्ट

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ७३

ऐसेपरी तयास्थानीं। प्रकट झाले श्रीगुरुमुनि।
अमरेश्वरातें पुसोनि। निघते झाले तये वेळीं॥ ७३ ॥

गद्यरुप :-

अशाप्रकारे त्याठिकाणी श्रीगुरुमुनि प्रकट झाले . त्यावेळी (भूमीगत राहिलेले श्रीगुरु पंचगंगासंगमावरील लोकांना माहित झाल्यावर) अमरेश्वराला विचारुन ते निघाले.

शब्दार्थ

पुसणे= विचारणे

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ७४

श्रीगुरु निघतां तेथोनि। आल्या चौसष्ट योगिनी।
विनविताति करुणावचनीं। आम्हां सोडूनि केवीं जातां॥ ७४॥

गद्यरुप :-

श्रीगुरु निघाले असताना चौसष्ट योगिनी तेथे आल्या करुण स्वरात विनवू लागल्या,आम्हा सोडून कसे जाता?

शब्दार्थ

योगिनी= जोगीण	केवी= कसे?

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ७५

नित्य तुमचे दर्शनेसीं। तापत्रय हरती दोषी।
अन्नपूर्णा तुम्हांपाशीं;।केवीं राहूं स्वामिया॥ ७५॥

गद्यरुप :-

"तुमच्या नेहमी होणाऱ्या दर्शनाने तापत्रयाने होणारे दोष नाहिसे होतात. तुमच्यापाशी अन्नपूर्णा आहे. स्वामी, तुमच्याबरोबर अन्नपूर्णा गेल्यावर आम्ही कशाप्रकारे राहू शकू?"

शब्दार्थ

नित्य= नेहमी	अन्नपूर्णा = पार्वती	केवी= कशाप्रकारे ?
तापत्रय= आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक अशा तीन प्रकारच्या पीडा. आध्यात्मिक पीडा= धार्मिक ब्रह्मज्ञानासंबंधी तसेच परमात्म्याविषयी अज्ञान आधिभौतिक= प्राण्यापासून झालेल्या शारीरिक पीडा अधिदैविक= देवकृत नियतीने दिलेल्या पीडा (भूकंप, पूर इत्यादी)		

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ७६

येणेंपरी श्रीगुरुसी। योगिनी विनविती भक्तीसीं।
भक्तवत्सलें संतोषीं। दिधला वर तया वेळीं॥ ७६ ॥

गद्यरुप :-

अशाप्रकारे योगिनींनी भक्तिभावाने श्रीगुरुंना विनविले. भक्तांवर माया करणाऱ्या श्रीगुरुंनी समाधानाने त्यावेळी वर दिला.

शब्दार्थ

योगिनी =जोगिण	वत्सल= मायाळू, ममताळू
संतोष=समाधान	दिधणे (प्राकृत)= देणे

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ७७

श्रीगुरु म्हणती तयांसी। सदा असों औदुंबरेसीं।
प्रकटार्थ जाणें पूर्वेसी । स्थान आमुचें येथेंचि असे॥ ७७ ॥

गद्यरुप :-

श्रीगुरु त्यांना (योगिनींना) म्हणाले," आम्ही सदैव औदुंबराच्या सान्निध्यात असू. आमचे स्थान येथेच (पंचगंगासंगमावरच्या ह्या औदुंबर वृक्षाखाली) असेल. पूर्व दिशेला आम्ही (भूमिगत अवस्थेतून बाहेर येऊन समाजासमोर) प्रकट होण्याच्या हेतूने जात आहोत.

शब्दार्थ

प्रकटार्थ= प्रकटणे गुप्त स्थिती टाकून बाहेर येणे	अर्थ= हेतू

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ७८

तुम्हीं रहावें येथें औदुंबरीं। कल्पवृक्ष मनोहरी।
अन्नपूर्णा प्रीतिकरीं। औदुंबरीं ठेवितों॥ ७८॥

गद्यरुप :-

तुम्ही ह्या औदुंबर वृक्षाखाली रहावे. हा कल्पवृक्ष मनोहर आहे. तुमच्यावर प्रेम करणारी अन्नपूर्णा (पार्वती) औदुंबर वृक्षाखाली ठेवतो.

शब्दार्थ

कर = करणे	अन्नपूर्णा = पार्वती

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ७९

कल्पवृक्ष औदुंबर। येथें असा तुम्ही स्थिर ।
अमरापुर पश्चिम तीर। अमर स्थान हेंचि जाणा॥ ७९ ॥

गद्यरुप :-

कल्पवृक्ष औदुंबर वृक्ष आहे, तुम्ही येथे स्थिर रहावे. (कृष्णानदीच्या) पश्चिम तीरावर असलेले अमरापूरक्षेत्र, हे अमर स्थान हेच जाणा.

शब्दार्थ

कल्पवृक्ष= इच्छित वस्तू देणारा वृक्ष

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ८०

प्रख्यात होईल स्थान बहुत। समस्त नर पूजा करीत।
मनकामना होय त्वरित। तुम्हीं त्यांसी साह्य व्हावें॥८०॥

गद्यरुप :-

हे स्थान प्रख्यात होईल. सर्व पुरुष येथे पूजा करुन आपल्या मनातील इच्छा त्वरित पूर्ण करतील. तुम्ही त्या सर्व पुरुषांना सहाय्य करावे.

शब्दार्थ

समस्त= सर्व	कामना= इच्छा

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ८१

तुम्हांसहित औदुंबरी। आमुच्या पादुका मनोहारी।
पूजा करिती जे तत्परीं। मनकामना पुरती जाणा॥८१॥

गद्यरुप :-

“तुमच्यासहित(योगिनींसहित)औदुंबराखाली असलेल्या आमच्या पादुका मनोज्ञ असल्याने, जे ह्या पादुकांची पूजा करतील, त्यांच्या मनातील इच्छा लगेच पूर्ण होतील, हे जाणा.

शब्दार्थ

मनोहारी= मनोज्ञ	कामना= इच्छा

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ८२

येथें असे अन्नपूर्णा। नित्य करिती आराधना।
तेणें होय कामना। चतुर्विध पुरुषार्थ॥८२॥

गद्यरुप :-

येथे असलेल्या अन्नपूर्णेची (पार्वतीची) जे लोक नेहमी आराधना करतील. त्यांना होणाऱ्या इच्छा पूर्ण होऊन त्यांना चारही पुरुषार्थांचा (धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष) लाभ होईल.

शब्दार्थ

अन्नपूर्णा=पार्वती	नित्य= नेहमी	कामना= इच्छा

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ८३

पापविनाशी काम्यतीर्थ। सिद्धतीर्थी स्नान करीत।
सात वेळ स्नपन करीत। तुम्हांसहित औदुंबरीं॥८३॥

गद्यरुप :-

"काम्यतीर्थ पापनाश करणारे असून, सिद्धतीर्थात स्नान करुन, तुमच्यासह औदुंबरवृक्षावर सातवेळा अभिषेक करणाऱ्यास"

शब्दार्थ

स्नपनं (संस्कृत)= स्नान घालणे, धुणे, शिंपडणे

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ८४

साठी वर्षें वांझेसी। पुत्र होती शतायुषी।
ब्रह्महत्या पाप नाशी। स्नानमात्रें त्या तीर्थीं॥८४॥

गद्यरुप :-

साठ वर्षांच्या वांझ पुरुषास (/स्त्रीस) शतायुषी पुत्र होतील. ह्या तीर्थावर फक्त स्नान केल्याने ब्रह्महत्येचे पाप नाहिसे होते.

शब्दार्थ

वंध्या =वांझ= संतान न होणारी स्त्री

वांझ= पूजा करणारा वांझ पुरुष

ओवी क्रमांक ८० नुसार "पूजा करणाऱ्या पुरुषांना तुम्ही सहाय्य करा" असे श्रीगुरु योगिनींना सांगतात.

ह्याचा अर्थ पूजा करणारा वांझ पुरुष असावा.

(कारण औदुंबर वृक्षाखालील मनोज्ञ पादुकांच्या पूजाविधीत स्त्रीचा उल्लेख दिसत नाही.)

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ८५

सोमसूर्यग्रहणेसी। अथवा मास संक्रांतीसी।
स्नान करिती भक्तीसीं। अनंत पुण्य -अश्वमेध॥ ८५॥

गद्यरुप :-

चंद्रसूर्याच्या ग्रहणकाळी, संक्रान्तीच्या महिन्यात, भक्तिने या तीर्थावर स्नान करणाऱ्यास, अश्वमेधाचे अनंत पुण्य पदरी मिळते.

शब्दार्थ

सोम=चंद्र	मास= महिना
अश्वमेध=सार्वभौम राजाने करण्याचा यज्ञ	

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ८६

सोमवारी अमावस्येसी। व्यतीपातादि पर्वणीसी।
स्नान करितां फळें कैसीं। ऐका श्रोते एकचित्तें। ॥८६ ॥

गद्यरुप :-

"सोमवती अमावस्येला (सोमवारी येणाऱ्या अमावस्येला) तसेच व्यतिपात इत्यादि पर्वणीला स्नान केल्यास मिळणारी फळे कशी असतात ? श्रोतेहो एकचित्ताने ऐका."

शब्दार्थ

व्यतीपात=ज्योतिष शास्त्र दृष्ट्या अशुभ योग

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ८७

श्रृंग- खूर- सुवर्णेसीं। अलंकृत धेनूसी।
सहस्त्र कपिला ब्राह्मणांसी। सुरनदीतीरीं दिल्हे फळ॥८७॥

गद्यरुप :-

शिंगे आणि खूर सोन्याने मढविलेल्या गायीला तसेच हजार कपिला गायी, गंगानदी तीरावर ब्राह्मणांना दान दिल्यावर मिळणारे पुण्य=ओवी क्रमांक ८६ नुसार सोमवती अमावस्येला तसेच व्यतिपात पर्वणीला स्नान केल्याने मिळते.

शब्दार्थ

श्रृंग= शिंग	सुवर्ण= सोने	अलंकृत= अलंकारांनी सुशोभित
खूर= खुर पाय कित्येक जनावरांच्या पावलावर टणक त्वचा असते तो भाग		
धेनू= गाय	सहस्त्र= हजार	सुरनदी= भागीरथी (गंगा),आकाशगंगा
कपिला= पिंगट रंगाची किंवा सबंध शरीरभर कोणत्यातरी एका रंगाची गाय		

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ८८

भक्तिभावेंकरूनि देखा। अन्न घालितां ब्राह्मणा एका।
कोटि ब्राह्मणासी ऐका।भोजन दिल्हें फळ असे॥८८॥

गद्यरुप :-

एका ब्राह्मणाला भक्तिभावाने अन्न (भोजन) दिले तर
कोटी ब्राह्मणांना भोजन दिल्याचे पुण्य - फळ मिळते .

शब्दार्थ

कोटी= शंभर लक्ष= एकावर सात शून्ये ही संख्या

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक

औदुंबरवृक्षातळीं। जप करिती जे मननिर्मळीं।
कोटिगुणें होतीं फळें। होम केलिया तैसेंचि॥८९॥

गद्यरुप :-

होम केल्यावर जसे कोटी (खूप) परिणाम देणारे फळ मिळते तसेच फळ औदुंबर वृक्षाखाली निर्मळ मनाने जप केल्यास मिळते.

शब्दार्थ

होम= यज्ञ हवन आहुती	तळ=खाली	गुण= परिणाम

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ९०

रुद्र जपोनि एकादशी। पूजा करिती मनोमानसीं।
अतिरुद्र केले फळसदृशी। एकचित्तें परियेसा॥९०॥

गद्यरुप :-

एकादशीला रुद्राचा जप करुन, मनोभावे पूजा करणाऱ्यास अकरा महारुद्र केल्यासारखे फळ मिळते, हे एकचित्ताने ऐका.

शब्दार्थ

अतिरुद्र= अकरा महारुद्र	सदृश=सारखे
परियसणे= ऐकणे	

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ९१

मंदगतीं प्रदक्षिणा । करितां होय अनंत पुण्य।
वा पदोपदीं वाजपेययज्ञ । फळ तेथें परियेसा ॥ ९१ ॥

गद्यरुप :-

मंदगतीने प्रदक्षिणा पूर्ण केल्यास, अनंत पुण्य मिळते किंवा वारंवार वाजपेययज्ञ केल्याचे फळ मिळते, हे ऐका.

शब्दार्थ

मंद=शनी	परियसणे= ऐकणे

जिज्ञासुंनी 'मंदगती' शब्दार्थासाठी शब्दार्थ चर्चा सदर पहावे.

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ९२

नमन करितां येणेंपरी । पुण्य असे अपरांपरीं।
प्रदक्षिणा दोन चारी । करूनि करणे नमस्कार ॥ ९२ ॥

गद्यरुप :-

दोन चार प्रदक्षिणा घालून नमस्कार करण्याच्या नमनाच्या पद्धतीने मिळणाऱ्या पुण्याची वाताहत होते, (म्हणजे अशा प्रदक्षिणांचे पुण्य मिळत नाही).

शब्दार्थ

चार= आचार= रीत	अपरांपरी= वाताहत, परकेपणा

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ९३

कुष्ठ असेल अंगहीन । त्याणें करणें प्रदक्षिणा।
लक्ष वेळ करितां जाणा । देवासमान देह होय॥९३॥

गद्यरुप :-

कुष्ठाने अवयवहीन झालेला असेल, त्याने (व्यक्तीने) प्रदक्षिणा करावी. अशा कुष्ठ झालेल्या व्यक्तीने औदुंबर वृक्षाच्या लाखेचा (चिकट पदार्थ) स्वतःच्या शरीराशी संधी केल्यास म्हणजे शरीराला लावल्यास त्या व्यक्तीचा देह देवासमान होईल.

शब्दार्थ

अंग=शरीरावयव= शरीर + अवयव =शरीराचा अवयव	
हीन =उणे, विरहित	वेळ= संधी
लक्ष= लाख= वड, पिंपळ इ झाडांपासून एक प्रकारच्या क्षुद्र जीवांनी केलेला एक चिकट पदार्थ औदुंबर वृक्षाच्या लाखेच्या औषधी गुणधर्मांचे संशोधन होणे, गरजेचे आहे.	

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ९४

ऐसें स्थान मनोहरु । सहज असे कल्पतरु।
म्हणोनि सांगताति गुरु । चौसष्ट योगिनींसी॥९४॥

गद्यरुप :-

असे हे मनोहर असलेले स्थान, स्वभावसिद्ध कल्पवृक्ष म्हणून आहे, असे चौसष्ट योगिनींना श्रीगुरु सांगत होते.

शब्दार्थ

सहज= स्वभावसिद्ध	कल्पवृक्ष= इच्छित वस्तू देणारा वृक्ष

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ९५

ऐसा निरोप देऊन । श्रीगुरु निघाले तेथून।
जेथें होतें गाणगाभुवन । भीमातीरीं अनुपम ॥ ९५ ॥

गद्यरुप :-

असा संदेश देऊन श्रीगुरु तेथून निघाले. भीमातीरी जेथे गाणगाभुवन (सध्याचे नाव गाणगापूर) हे अनुपम ठिकाण होते, तेथे जाण्यासाठी निघाले.

शब्दार्थ

निरोप= संदेश	अनुपम= उपमा देता येत नाही असे

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ९६

विश्वरूप जगन्नाथ । अखिल ठायीं असे वसत ।
औदुंबरीं प्रीति बहुत । नित्य तेथें वसतसे॥९६॥

गद्यरुप :-

विश्वरुप जगन्नाथ सर्व ठिकाणी वसलेला (अस्तित्वात) असतो. औदुंबर वृक्षावर त्याचे खूप प्रेम असल्याने नेहमी तेथे रहातो.

शब्दार्थ

अखिल= सर्व	ठाय= ठिकाण	प्रीति= प्रेम
बहुत= खूप	नित्य= नेहमी	वसणे= राहणे

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ९७

गौप्य राहोनि औदुंबरीं । प्रकटरूपें गाणगापुरीं।
राहिले गुरु प्रीतिकरीं । प्रख्यात झाले परियेसा॥९७॥

गद्यरुप :-

गुप्तरुपाने(नरसोबावाडीतील) औदुंबरवृक्षाखाली राहणारे श्रीगुरु गाणगापूरला प्रकटरुपाने राहिले. श्रीगुरु प्रेमळ स्वभावामुळे (प्रेम करण्यामुळे) प्रसिद्ध झाले, हे ऐका.

शब्दार्थ

गौप्य= गुप्त गोष्ट	प्रीति= प्रेम	कर=करणे
प्रख्यात= प्रसिद्ध	परियसणे= ऐकणे	

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ९८

सिद्ध म्हणे नामधारकासी । श्रीगुरुमहिमा आहे ऐसी।
प्रकट झाले बहुवसी । गाणगापुरी परियेसा॥९८॥

गद्यरुप :-

सिद्ध(मुनि) नामधारकास (शिष्यास) म्हणाले,

"श्रीगुरुमहिमा असा आहे. गाणगापूरी सर्वज्ञ (श्रीगुरु) प्रकट झाले हे ऐका."

शब्दार्थ

बहुवस= सर्वज्ञ	परियसणे= ऐकणे

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक ९९

म्हणोनि सरस्वतीगंगाधर। सांगे गुरुचरित्रविस्तार।
भक्तिपूर्वक ऐकती नर। लाभे चतुर्विध पुरुषार्थ॥९९॥

गद्यरुप :-

सरस्वती गंगाधर गुरुचरित्र म्हणून विस्ताराने सांगतात , जे पुरुष भक्तिपूर्वक ऐकतात ,त्यांना चारही पुरुषार्थांचा लाभ होतो.

शब्दार्थ

नर= पुरुष	चार पुरुषार्थ= धर्म, अर्थ काम आणि मोक्ष

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओवी क्रमांक १००

गुरुचरित्र कामधेनु। जे ऐकती भक्तजनु।
त्यांचे घरीं निधानु। सकळाभीष्टें पावती॥ १०० ॥

गद्यरुप :-

जे भक्त कामधेनूसारखे असलेले गुरुचरित्र ऐकतात, त्यांच्या घरी (त्यांना घरातील) सगळ्यांचे कल्याण करणारा खजिना मिळतो.

शब्दार्थ

कामधेनू= इच्छित वस्तू देणारी गाय	निधान= खजिना
सकळाभीष्ट= सकळ (सगळे) अभीष्ट कल्याण	पावणे= मिळणे

औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान

ओंवीसंख्या १००

इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ

श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्ध- नामधारकसंवादे

औदुंबरवृक्षमहिमानं योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदानं

नाम एकोनविंशोऽध्यायः ॥ १९ ॥

॥ श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ ॥ श्रीगुरुदेवदत्त ॥

गद्यरुप :-

अशाप्रकारे श्रीगुरुचरित्र अमृतातून , कल्पतरुप्रमाणे परमकथा असणाऱ्या, श्रीनृसिंहसरस्वती यांच्या उपआख्यानातून , सिद्ध (मुनी) व नाम धारक यांच्या संवादातून , औदुंबरवृक्षमहिमान योगिनीप्रतिदिनदर्शन तथा वरप्रदान नावाचा एकोणिसावा अध्याय श्रीगुरुदत्तात्रेयाला अर्पण असो.

शब्दार्थ

एकोनविंशो= १९

॥ श्रीगुरुदेवदत्त ॥